**प्रेस नोट** **दिनांक ०४/०४/२०२५**

१) रामेश्वर काशिनाथ बचाटे, वय ३५ वर्षे, पद पोलीस पाटील वडगाव स्टेशन , ता.सोनपेठ जि. परभणी राहणार वडगाव स्टेशन ता.सोनपेठ जि.परभणी(इलोसे महसूल विभाग) ०२). वैजनाथ सुंदरराव बचाटे,वय ७४ वर्षे, राहणार वडगाव स्टेशन ता.सोनपेठ जि.परभणी ('खाजगी इसम') हे ५०,०००/- रुपयांची लाच स्विकारले प्रकरणी असीबीच्या जाळयात

| | |
|---|---|
| युनिट | लाप्रवि युनिट परभणी |
| पो.स्टे.गुरनं व कलम | पोस्टे गंगाखेड गुरनं. २२०/२०२५ कलम ७,७ अ,१२ भ्र.प्र.अधिनियम १९८८ |
| गुन्हा दाखल दिनांक | दि.२७.०३.२०२५ |
| आरोपी यांचे नाव, हुद्दा व पत्ता. | १) रामेश्वर काशिनाथ बचाटे, वय ३५ वर्षे, पद पोलीस पाटील वडगाव स्टेशन , ता. सोनपेठ जि. परभणी राहणार वडगाव स्टेशन ता.सोनपेठ जि.परभणी (इलोसे महसूल विभाग)<br>०२). वैजनाथ सुंदरराव बचाटे,वय ७४ वर्षे, राहणार वडगाव स्टेशन ता.सोनपेठ जि. परभणी (खाजगी इसम) |
| लाचेची मागणी | १,२५,०००/- रुपये |
| लाच स्विकारली रक्कम | पहिला हप्ता ५०,०००/- रुपये |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे गावी ग्रामपंचायत कडून चार पांदण रस्त्याचे काम सध्या सुरु आहे. तक्रारदार यांचेकडे असलेल्या हायवा ट्रॅक व त्यांचे मामा कडील जेसीबीने ते दोघे मुरुम व विहिरी मधून निघालेला पाषाण दगड रस्त्यावर टाकून रस्त्याचे काम करीत आहेत. दि.२१/०३/२०२५ रोजी वडगाव (स्टे.) गावचे पोलीस पाटील रामेश्वर बचाटे हे तक्रारदार यांना भेटून म्हणाले की, '' तुमचे हायवा आणि जेसीबीने तुम्ही दोघे गौण खनिजाची बेकायदेशीर वाहतूक करीत आहात. तुम्ही मला प्रत्येकी ५००० रुपये प्रमाणे दोघांचे १०००० रुपये दर दिवशी द्या, नाही तर ही माहिती मी पोलीस स्टेशन आणि तहसील ऑफिसला देईल. त्यामुळे तुमच्यावर गौण खनिज चोरीचा गुन्हा दाखल होईल. तक्रारदार यांना पोलीस पाटील रामेश्वर बचाटे हे मागत असलेली रक्कम लाच असल्याने ती त्यांना देण्याची इच्छा नाही. अशी तक्रार दि.२३/०३/२०२५ रोजी एसीबी परभणी येथे दिली.

दि.२३/०३/२०२५ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही मध्ये लोकसेवक रामेश्वर बचाटे यांनी एकूण चार पांदण रस्त्याचे कामासाठी दीड लाख रुपयांची मागणी करून तडजोडीअंती प्रथम ५० हजार रुपये आणि नंतर ७५ हजार रुपये असे १,२५,००० रुपयाची मागणी केली. लाचेची रक्कम खाजगी इसम वैजनाथ बचाटे यांचेकडे देण्यास सांगून लाच रक्कम स्विकारण्यास सहमती दिली.

दि.०४/०४/२०२५ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आरोपी वैजनाथ सुंदरराव बचाटे यांनी तक्रारदार यांच्या कडून लाचेच्या रकमेचा पहिला हप्ता ५०,००० रुपये स्वत: स्विकारला आहे. आरोपी वैजनाथ सुंदरराव बचाटे यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले असून लोकसेवक रामेश्वर काशिनाथ बचाटे यांना देखील ताब्यात घेण्यात आले त्याचे विरुध्द पो.स्टे.गंगाखेड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| सापळा पथक | श्री.अशोक इप्पर, पोलीस उप अधीक्षक, लाप्रवि परभणी ASI निलपत्रेवार , पो.अंमलदार नामदेव आदमे, राम घुले, कल्याण नागरगोजे, चापोह कदम व नरवाडे सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,परभणी. |
| सापळा व तपास अधिकारी | श्री.अल्ताफ मुलाणी, पोलीस निरीक्षक, लाप्रवि परभणी |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या इसमाविरुध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.**


| | |
|---|---|
| संपर्क पत्ता :- कार्यालय पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, शनिवार बाजार,नानलपेठ, परभणी. | |
| दुरध्वनी क्रमांक :- 02452-220597 टोल फ्री क्रमांक:- 1064 ऑनलाईन ॲप acbmaharastra.net | |
| spacbnanaded@mahapolice.gov.in | dyspacbparbhani@mahapolice.gov.in |
| Facebook : Acb Parbhani | Facebook page : Anti Corruption Bureau,Parbhani. |
| Instagram : acbparbhani | Twitter : @ACBPARBHANI |
| Youtube Channel @ACBParbhani | Find us on Google Map & Mappels india Map |
| 9272111064 | |


पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,परभणी

Scanned with OKEN Scanner